खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर

ता. खेड, जि. पुणे

## तृतीय वर्ष कला (TYBA)

## मराठी (एस - 3)

### सत्र : सहावे

# विषय : मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा स्थूल इतिहास (इ.स.१६०० ते १८१७)

## घटक १ ) शिवकाल आणि पेशवेकाळातील वाङ्मयनिर्मिती

SANJAY MAR HRM

डॉ. संजय शिंदे
उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर

ई - मेल : dr.sdshinde80@gmail.com भ्रमणध्वनी क्र. : 9604309060

# घटक १ ) शिवकाल आणि पेशवेकाळातील वाङ्मयनिर्मिती

## १)या कालखंडाची सामाजिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी

## २) संत तुकाराम : वाङ्मयनिर्मितीचे स्वरूप

## ३) संत रामदास : वाङ्मयनिर्मितीचे स्वरूप

## १) संत तुकारामांची काव्यनिर्मिती – प्रेरणा, स्वरूप व कार्य

प्रास्ताविक –

संत तुकाराम हे संत एकनाथांच्या नंतरचे भागवत संप्रदायाचे श्रेष्ठ असे संतकवी होत. १७व्या शतकातील शिवाजीमहाराजांच्या काळात ते होऊन गेले. त्यांचा जन्म आणि मृत्यू यांच्या निश्चित कालखंडाविषयी अभ्यासकांमध्ये मतभेद असले तरी सर्वसाधारणपणे इ.स. १६०६ ते १६४९ असा त्यांचा जीवनकाळ मानला जातो. संत तुकारामांचा जन्म देहू गावी वडील बोल्होबा व आई कंकाई यांच्या पोटी झाला. त्यांना सावजी व कान्होबा असे दोन भाऊ होते. त्यांच्या कुटुंबामध्ये पूर्वीपासून विठ्ठलभक्ती चालत आली होती. त्यांचे वडील धार्मिक वृत्तीचे आणि भाऊ अतिशय विरक्त होते. त्यामुळे घरी असलेल्या वाणसामानाच्या दुकानाची जबाबदारी तुकारामांवर होती. त्यांचाही संसार होता. त्यांची दोन लग्ने झाली. त्यांना मुलेही होती. मात्र प्रपंचाचे सुख तुकारामांना फारसे लाभले नाही. त्यांच्या वडिलांपाठोपाठ आईचेही निधन झाले. वाणसामानाचा धंदाही फारसा चालेनासा झाला. इ.स. १६२९ ते १६३० दरम्यान महाराष्ट्रात फार मोठा दुष्काळ पडला होता. त्याचा तुकारामांच्या व्यवसायाला आणि प्रपंचाला मोठा फटका बसला. त्यांचा मोठा भाऊ सावजी आपल्या पत्नीच्या मृत्यूमुळे संसारातून पूर्णपणे विरक्त झाला. तुकारामांची पहिली पत्नी रखमाबाई यांचा आजारपणामुळे तर त्यांचा मोठा मुलगा संतू याचाही दरम्यानाच्या काळात मृत्यू झाला. दुष्काळात गुरे–ढोरे विकावी लागली. भयंकर हालाकीच्या आणि उपासमारीच्या अवस्थेत तुकारामांना दुःख सहन होईना. त्यांचे मन हळूहळू त्या दुःखपासून, संसारापासून दूर जावू लागले. त्यांना ईश्वरभक्तीची गोडी लागली, विठ्ठलाचा ध्यास लागला. व्यवसाय आणि संसारापासून त्यांचे मन पूर्णपणे उडाले. दुष्काळ आणि साथीच्या आजारामुळे त्यांची व सभोतालच्या समाजाची मोठी हानी झाली. परिणामी ते प्रपंचापासून दूर देहूजवळच्या भंडारा डोंगरावर विठ्ठलनामाचे चिंतन करीत बसू लागले. तेथे त्यांनी संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ यांचे अभंग आळवले, ग्रंथ अभ्यासले. भजन – कीर्तनाला प्रारंभ केला. साक्षात्कार झाल्यावर प्रथम त्यांनी लोकांनी त्यांच्याकडे ठेवलेली अर्जखते इंद्रायनीत बुडविली. प्रपंचात राहून समाजातील अवनतीवर अभंगरचनेतून कोरडे ओढले.

तुकारामांना देहू गावी सनातन वर्गाकडून खूप त्रास सोसावा लागला. त्यांच्या अभंगाच्या वहया इंद्रायनीत बुडविल्या आणि त्या वहया जशाच्या तशा वर आल्याची चमत्कार कथाही सांगितली जाते. तुकारामांना होणारा

SANJAY MAR HRM

समाजनिंदेचा त्रास आणि त्यांच्या अभंगरचनेचे सामर्थ्ये या दंतकथेने सूचविलेले आहे असे म्हणावयास हरकत नाही. तुकारामांची शिवाजीमहाराज व रामदासस्वामींशी झालेल्या भेटीबद्दल निश्चित पुराव्यानिशी सांगता येत नाही. ते अजुनही विद्वानांच्या मतभेदाचे विषय आहेत. तुकारामांचे वैकुंठगमन हा ही बहुजन समाजात दंतकथेचा विषय झाला आहे आणि त्याबद्दलही अभ्यासकांमध्ये वेगवेगळी मते आहेत.

## संत तुकारामांचे अभंग –

संत तुकारामांचे आज सुमारे **साडेचार हजार अभंग** उपलब्ध असून त्या प्रत्येक अभंगामध्ये प्रत्येक माणसाच्या अंत:करणापर्यंत जाऊन भिडण्याचे सामर्थ्य आहे. शुद्ध अंतरंगाच्या बीजापोटी जन्म घेतल्याने ती रसाळ, गोमटी बनली आहे. तुकारामांच्या आत्मपर अभंगातून भावनेची उत्कटता, विठ्ठल भेटीची तळमळ, व्याकूळता दिसते. परमेश्वराचे दर्शन झाल्यावर आलेली आत्मसाक्षात्काराची जाणीव समाजाला उपदेश करण्यासाठी लिहिली. नीतीपर अभंगातून परखडपणा आणि स्पष्टोक्तीही आढळते. त्यांच्या अभंगाची शैली परखड आणि हळूवार आहे. गीता, भागवत हे तुकारामांचे आवडते ग्रंथ होते. पण त्याशिवाय त्यांनी इतर पुराणेही अभ्यासली होती. मराठी साहित्यात तुकारामांच्या अभंगवाणीचे स्थान सर्वांत वरचे असून ती सामान्यांच्या हृदयाला जाऊन भिडली आहे.

**'नामदेवे केले, स्वप्नामाजी जागे । सवे पांडुरंगे येऊनिया ।**
संगितले काम, करावे कवित्व । वाऊगे निमित्त बोलो नये ।'

अशी आपल्या कवित्वस्फूर्तीची कथा ते सांगतात.

**'मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास । कठीण वज्रासि भेदू ऐसे** । असे तुकारामांनी स्वत:चे वर्णन केले आहे. तुकारामांच्या अभंगातून त्यांचे मन प्रकट झाले आहे. आपल्या अभंगातून ते समाजातील सर्व अनिष्ठ प्रथांना, घातक रूढींना विरोध करतात. जातीभेद त्यांना मान्य नाही. लबाड व ढोंगी साधूंवर ते विचाराने हल्ला चढवतात. **अमंगल, अनिष्ट अशा सर्व गोष्टींवर आघात करणे आणि शुद्ध, मंगल, कल्याणकारी असा भक्तीचा मार्ग दाखवणे असे दुहेरी कार्य तुकारामांच्या अभंगानी केले.** तुकारामांचा देव देवळात नाही तर समाजातील दीन–दुबळयांची सेवा करण्यामध्ये, त्यांना आपले म्हणणाऱ्या संत सज्जनांमध्ये देवाचे रूप पाहिले आहे. अशा या संत तुकारामांच्या अभंगात त्यांनी अनेक विषय हाताळले आहेत. साधारणपणे त्या अभंगरचनेचा **अ) आत्मपर अभंग ब) विठ्ठल भक्तीपर व पंढरी महात्म्यपर अभंग क) सामाजिक व नीतीपर अभंग असा विचार करता येतो.**

### अ) आत्मपर अभंग –

तुकारामांच्या आत्मपर अभंगात प्रामुख्याने 'अंतर्बाह्य जग आणि मन' यांच्यामध्ये चालू असलेल्या मानसिक युद्धाचा आलेख आहे. त्यांना विठ्ठलाची ओढ लागलेली आहे. पण प्रत्यक्ष दर्शन होत नाही म्हणून ते बेचैन होतात. विठ्ठलाच्या दर्शनासाठी उतावीळ झालेले मन ते पुढील अभंगात व्यक्त करतात.

**'कन्या सासुरासी जाये । मागे परतोनी पाहे ।।**

तैसे झाले माझ्या जीवा । कधी भेटसी केशवा । ।'

या सारख्या अभंगातून त्यांच्या मनातील आर्तता आणि तडफड व्यक्त झाली आहे. तरीही विठ्ठलाचे दर्शन होत नाही तेव्हा ते असहाय बनून विठ्ठलाला म्हणतात,

**'आणिकांची चाले सत्ता आम्हांवरी । तुमची ती थोरी काय मग । ।**

तुका म्हणे आलो दुरोनि जवळ । आता टाळाटाळी करू नये । ।'

स्वत:च्या असमर्थतते बद्दल संताप आणि विठ्ठल भेट होत नाही म्हणून असाहय कारूण्य अशा द्विधा मन:स्थितीचे मिश्रण या अभंगात दिसते. जेव्हा सारे प्रयत्न विफल होतात तेव्हा काही अभंगातून त्यांनी विठ्ठलाला चोरटा, शिंदळ, भारवाही, निलाजरा असेही म्हटले आहे. अर्थात हे सारे भांडण प्रेमापोटी आहे. अशा निराशेच्या अनेक अंदोलनांनी भरलेल्या या साधकावस्थेला 'आध्यात्मिक तळमळीची रात्र' असेही म्हटले जाते. एक दिवस अचानक त्यांना विठ्ठलाचा साक्षात्कार होतो. आता अंध:कार निरसला. तहानभूक हरपली आणि मन विठ्ठलचरणी स्थिरावले. अणू एवढा असणारा तुका आता आकाशाएवढा झाला. **'अणूरेणू या थोडका। तुका आकाशाएवढा।'** हा अद्‌भूत अनुभव घेतल्यानंतर बोलणे–अबोलणे, असणे–नसणे यांच्या पलिकडे तुकाराम गेले. **'आपुले मरण पाहिले म्या डोळा'** असा दिव्य अनुपम सोहळा त्यांनी अनुभवला. न देखोनिही सकळ पाहिल्याची जाणीव त्यांना होऊ लागली.

**'आनंदाचे डोही आनंद तरंग । आनंदची अंग आनंदाचे ।'**

अशा अर्थपूर्ण शब्दात तुकारामांनी आपला श्रेष्ठतम अनुभव व्यक्त केला आहे.

### ब) विठ्ठल भक्तीपर व पंढरी महात्म्यपर अभंग –

विठ्ठलाचे दर्शन झाल्यावर तुकारामांचे जीवन विठ्ठलमय होऊन गेले. विठ्ठलाच्या सगुण साकार मूर्तीवर त्यांनी जीवापाड प्रेम केले.

**'काय उणे आम्हा विठोबाच्या पायी । नाही ऐसे काही तेथे एक'**

असे विठ्ठल माहात्म्य सांगताना संसाराची आसक्ती आणि दीनांचा कळवळा असणाऱ्या विठ्ठलाला अनन्यभावे शरण जा, असा उपदेश तुकारामांनी केला आहे. विठ्ठल त्यांचा नाथ आहे. त्यांना कशाचे भय नाही.

**'सुंदर ते ध्यान उभे विटेवरी । कर कटावरी ठेऊनिया ।**

तुळशीहार गळा कासे पितांबर । आवडे निरंतर हेचि ध्यान ।

हे त्यांनी विठ्ठलाचे रेखाटलेले शब्दचित्र परमसुंदर आणि मनोवेधक असे आहे. हा विठ्ठलच त्यांचा जीव आणि भाव आहे.

पंढरीला तुकारामांनी माहेर म्हटले आहे.

**'आपुल्या माहेरा जाईन मी आता । निरोप या संताहाती आला ।'**

अशा शब्दात ते पंढरीचे वर्णन करतात. पंढरीस दु:खाच्या मोबदल्यास सुख मिळते. एकदा डोळयांनी चंद्रभागेचे दर्शन घेतले की सर्व तीर्थांची यात्रा आपोआप घडते. आई–वडील विसरायला लावण्याइतके सामर्थ्य पंढरीत आहे. म्हणून तुकाराम म्हणतात,



SANJAY MARHRM

'चला पंढरीसी जाऊ । रखुमादेवीवरा पाहू । ।
डोळे निवतील कान । मना तेथे समाधान । ।

तुकारामांच्या उपदेशातील प्रमुख धागा भक्तीचा आहे. पण ही भक्ती म्हणावी तेवढी सोपी नसते तर ती सुळावरील पोळी आहे, असे ते बजावतात. यासाठी ते नामसंकीर्तनाला महत्त्व देतात.

'नामसंकीर्तन साधन पै सोपे । जळतील पापे जन्मांतराची ।'

असे या नामसंकीर्तनाचे माहात्म्य आहे.

'आम्ही तेणे सुखी । म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखी ।'

या सारख्या अभंगामधून तुकारामांनी नामभक्तीचा पुरस्कार केला आहे. अशा प्रकारची प्राजंळ भावनेने केलेली भक्ती तुकारामांना श्रेष्ठ वाटते.

### क) सामाजिक व नीतीपर अभंग –

तुकारामांचा पिंड जसा भावनाप्रधान भक्ताचा होता तसा परखड समाजसुधारकाचाही होता.

**'बुडती हे जन न देखावे डोळा । येतो कळवळा म्हणवुनि ।'**

अशा कळवळयापोटी त्यांनी समाजाला उद्धाराचा मार्ग दाखवून त्यांच्या जीवनाच्या वाटा उजळावयाच्या होत्या. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथांचे कार्य त्यांना पुढे चालवायचे होते. म्हणून साक्षात्कारी अनुभव आल्यावर तुकाराम

**'वेदांचा तो अर्थ आम्हासी ठावे । वेदांनी वहावा भार माया ।'**

असे ते आत्मविश्वासाने म्हणू लागले. नव्या विशाल दृष्टीने त्यांनी समाजस्थिती पाहिली व सामाजिक तळमळीच्या जाणिवेने त्यांना उपदेश केला. भोवती जे ढोंगी संन्याशी होते त्यांची त्यांनी

**'दाऊनी वैराग्याची कळा । भोगी विषयाचा सोहळा ।'**

अशा उपहासात्मक शब्दात हजेरी घेतली आहे. ढोंगी संन्याशी, अभक्त ब्राह्मण, संतांचा मत्सर करणारे नास्तिक या सर्वांवर तुकारामांनी तीष्ण शब्दांनी हल्ले केले आणि त्यांना डोळस भक्ती व सामाजिक नीती शिकविली. 'सालोमालो' सारख्या भुरटया कवीने आपले कवित्व चोरून स्वत:च्या नावावर खपविलेले पाहून

**'उष्टया पत्रावळी करूनिया गोळा । दाविलीसी कळा विद्वत्वाची ।'**

अशा उपहासपूर्ण शब्दात ते त्याचा निषेध करतात. कारण

**'तुका म्हणे झरा । आहे मुळचाचि खरा ।'**

**'आम्हां घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचिच शस्त्रे यत्न करू'**

या सारख्या अभंगातून तुकारामांनी शब्द हाच आपला देव मानला आहे.

तुकारामांनी भक्ती करण्यासाठी श्रेष्ठ, कनिष्ठ असा भेदभाव नसावा. नीतीयुक्त आचरण व शुद्ध अंत:करण असावे हे आपल्या अभंगातून प्रामुख्याने सांगितले आहे. त्यांचे नीतीपर अभंग म्हणजे सुंदर स्तुतीपाठच आहेत. रोजच्या अनुभवातल्या आणि व्यवहारातल्या दृष्टांताची मदत घेऊन त्यांनी हे परखड विचार सांगितल्यामुळे ते प्रभावी झाले आहेत. उदा. –

SANJAY MARHRM

जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले । तोचि साधू ओळखावा । देव तेथेचि जाणावा । ।'

१. दया, क्षमा, शांती । तेथे देवाची वसती ।
२. मुलाम्याचे नाणे । तुका म्हणे नव्हे सोने ।
३. विती एवढेसे पोट । केवढा बोभाटा तयाचा ।
४. सुख पाहता जवापाडे । दु:ख पर्वताएवढे ।
५. मोले घातले रडाया । नाही आसू नाही माया ।
६. शुद्ध बिजा पोटी । फळे रसाळ गोमटी ।
७. तुका म्हणे तोचि संत । सोशी जनाचे आघात ।
८. निश्चयाचे बळ । तुका म्हणे तेची फळ ।
१०.नाही निर्मळ जीवन । तया काय करीन साबन ।
११.आलिया भोगासी । असावे सादर ।
१२.मुंगी आणि राव । आम्हा सारखाच जीव ।
१३.बुडती हे जन न देखावे डोळा । येतो कळवळा म्हणवूनी ।
१४.एकमेका साहय करू । अवघे धरू सुपंथ ।
१५.मऊ मेनाहुनी आम्ही विष्णुदास । कठीण वज्रास भेदो ऐसे ।
१६.बोले तैसा चाले । त्याची वंदावी पाऊले ।

या सारखे काही अभंगातील चरण म्हणजे साक्षात जीवनानुभवाचे सार आहे. त्यामुळे या अभंगचरणांना सुंदर सुभाषितांचे स्वरूप प्राप्त झाले आहे. सामाजिक जीवनात नीती ही भक्ती मानून रूढ संकेतांवर, दांभिकपणावर, अंधश्रद्धेवर त्यांनी कडाडून विरोध केला. याशिवाय 'अल्पाक्षरत्व' हे तुकारामांच्या लेखनशैलीचे वैशिष्टे यात पाहावयास मिळते. १७व्या शतकातील मराठी संस्कृती आणि भाषा यांचे अस्सल दर्शन त्यांच्या अभंगरचनेत दिसून येते.

## संत तुकारामांचे कार्य –

### विठ्ठलभक्ती बहुजन समाजापर्यंत पोहचवली –

वारकरी संप्रदायाच्या दृष्टीने तुकारामांचे कार्य फार मोलाचे आहे. त्यांनी विठ्ठलभक्तीची मिरास बहुजन समाजापर्यंत, स्त्री–शुद्रांपर्यंत पोहचवली. **'हे चि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ।'** ही ध्यासपूर्ण भक्ती हा तुकारामांच्या कवितेचा आत्मा आहे. केवळ वारकऱ्यांनाच नव्हे तर सर्व समाजाला नीतीमूल्यांची आठवण करून देणे हे तुकारामांनी आपले कर्तव्य मानले. सामाजिक जीवनात त्यांनी नीती हीच भक्ती मानली.

### जातीभेदाला विरोध केला –

**'याति कुळ येथे असे अप्रमाण । गुणांचे कारण अंगी असे ।'** अशा शब्दात तुकारामांनी जन्मावर आधारित जातीव्यवस्थेला, वर्णव्यवस्थेला विरोध केला. बहुजल समाजात जन्माला येऊनही जन्मजात वर्णधर्माच्या



SANJAY MAR HRM

ठेकेदारांकडून निंदा, द्वेष, विरोध या सारख्या आपत्तींना तोंड देऊन उच्चवर्गीयांनाही लाळ घोठावयास लावणारे श्रेष्ठत्व त्यांनी केवळ आपल्या प्रयत्नांनी प्राप्त करून घेतले आणि तो आदर्श बहुजन समाजासमोर ठेवला. **'असाध्य ते साध्य करिता सायास । कारण अभ्यास तुका म्हणे ।'** असा विश्वास त्यांनी स्त्री–शुद्रांना प्राप्त करून दिला. अशा प्रकारे त्यांनी जातीभेदाला विरोध करून सामाजिक कार्य केले.

### अभंगातून नीतीपर उपदेश केला –

आपल्या असंख्य अभंगातून तुकारामांनी संसाराची असारता आणि क्षणभंगुरता पटवून दिली आहे. हा केवळ अध्यात्माचा उपदेश नव्हता तर तुकारामांचे स्वानुभवाचे ते रोकडे बोल होते. ते म्हणतात, देहाच्या ओल्या मातीचा भरवसा धरण्यात अर्थ नाही. तारूण्यात चिरीव असणारे सुंदर डोळे म्हतारपणी सर्कीसारखे असतात आणि हा देह तरी आपला कुठे आहे? येथे **'सुख पाहता जवापाडे । दु:ख पर्वताएवडे ।'** आहे. या संसाराचा मोह धरणे म्हणजे ढेकणाच्या बाजेवर शांत झोपण्याची अपेक्षा करण्याइतके व्यर्थ आहे. जन हे सुखाचे, दिल्या घेतल्याचे आहे. आणि सोयरीही केवळ सुखाचीच आहे. एकाची दहने अनेकाने पाहूनही या संसाराची नश्वरता तुमच्या कधी लक्षात येणार? असा प्रश्न ते आपल्या अभंगातून विचारतात.

### कीर्तन संस्थेचा पुरस्कार केला –

सामाजिक जागृतीसाठी आणि भक्तीचा प्रसार करण्यासाठी तुकारामांना कीर्तन संस्था अधिक उपयुक्त वाटते. कीर्तनातून हरीभक्तीचा जागर करणे हाच इश्वरभक्तीचा सर्वश्रेष्ठ मार्ग आहे, असे ते म्हणतात. देव, भक्त आणि नाम यांचा त्रिवेणी संगम म्हणजे हरीकीर्तन असे ते सांगतात. हरीकीर्तनाच्या माध्यमातून तुकारामांनी 'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म' हे पटवून देत **'शुद्ध बिजा पोटी । फळे रसाळ गोमटी'** निपजतात हे जनमानसावर ठसविले.

### अभंगवाणीचे सामर्थ्य –

तुकारामांच्या अभंगातून **संत, कवी आणि सुधारक** अशी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची तीन रूपे दिसून येतात. **'उष्टया पत्रावळी करूनिया गोळा । दाविलीसी कळा विद्वत्वाची ।'** असा कठोर उपहास, **'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे । पक्षीही सुस्वरे आळविती ।'** हा चराचराशी सुसंवाद साधणारा चित्ताचा हळूवारपणा, **'अणूरेणू या थोडका। तुका आकाशाएवढा।'** हा दिव्य साक्षात्काराचा शब्दातीत अनुभव अशा असंख्य भावछटा तुकारामांच्या अभंगवाणीत आढळतात. लोकांना स्वहिताच्या खुणा सांगताना **'दया, क्षमा, शांती । तेथे देवाची वसती ।'** अशी तुकारामांची वाणी उच्च स्तरावर जाते. सामाजिक प्रबोधनापोटी त्यांच्या कवितेत लोकजीवनातील दृष्टांत, लोककथा आणि व्यक्तिचित्रे आली आहेत. त्यांची अभंगवाणी आजही जनसामान्यांना हलवते. याचे कारण जीवनाच्या अनुभवातून आणि सूक्ष्म निरीक्षणातून ती प्रकट झाली आहे आणि हेच त्यांच्या अभंगवाणीचे सामर्थ्य आहे.

समारोप –

अशा प्रकारे तुकारामांची अभंगवाणी म्हणजे त्यांचे संपूर्ण आत्मचरित्र आहे. त्यांच्या मनाचे निखळ बिंब त्यांच्या अभंगवाणीत उमटले आहे. तळमळ, सहजता या भावनांबरोबरच त्यांच्या अभंगात भक्तीरस ओतप्रोत भरला आहे. ममता, वात्सल्य, प्रामाणिकपणा, कारूण्य, कणव या भावनांचे दर्शन त्यात घडते. त्यांचे काव्य जसे कोमल आहे तसे परखडही आहे. मानवतेचे प्रत्यंतर देणारी त्यांची कविता आहे.

**'जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले । तोचि साधू ओळखावा । देव तेथेचि जाणावा ।।'** रंजल्या गांजल्यांना पोटाशी धरून प्रेम आणि वात्सल्याची उधळण करणारा, प्रसंगी कठोर जीवनभाष्ये करणारा, सामान्य मानसात देव शोधून मानवतेचे विचार मांडणाऱ्या तुकारामांचे कार्य वारकरी संप्रदायासाठी महत्त्वाचे ठरले आहे. समाजाची नैतिक उन्नती व्हावी या तळमळीने त्यांनी केलेले कार्य सर्वसामान्य माणसाला इतके प्रभावी करणारे होते की 'ज्ञानोबा–तुकाराम' हा त्यांचा 'मंत्रघोष' बनला. त्यामुळे आजही तुकारामांची वाणी आणि विचारांचा प्रभाव लोकमानसावर पडलेला दिसतो. वारकरी संप्रदायातील तुकारामांच्या कार्याचे नेमके स्थान सांगताना त्यांच्या शिष्या बहिणाबाई म्हणतात की,

'संतकृपा झाली । इमारत फळा आली ।
ज्ञानदेवे रचिला पाया । उभारले देवालया ।
नामा तयाचा किंकर । तेणे केला हा विस्तार ।
जनार्दन एकनाथ । खांब दिला भागवत ।
तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।'

---

# २) संत रामदास – प्रेरणा, स्वरूप आणि कार्य

प्रास्ताविक –

संत मालिकेत समाविष्ट होणारे परंतु स्वत:चा स्वतंत्र असा संप्रदाय निर्माण करणारे रामदास हे १७ व्या शतकातील आगळे–वेगळे कवी होत. त्यांच्या काव्यातून 'संत' व 'समर्थ' अशी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची दोन रूपे आपणास आढळतात. रामदासांचा जन्म जांबेस इ.स. १६०८ मध्ये ( चैत्र शुद्ध नवमी ) झाला. त्यांचे मूळ नाव नारायण होते. वयाच्या ९व्या वर्षी त्यांना श्रीरामदर्शन व अनुग्रह मिळाला. १३व्या वर्षी 'सावधान' हा शब्द ऐकून लग्न मंडपातून पलायन करून ते नाशिकजवळ टाकळी येथे आले. तेथे गोदावरीच्या तिरावर त्यांनी १२ वर्षे रामभक्ती केली. साधना केली. अनेक ग्रंथांचा अभ्यास करून त्यांचे चिंतन केले. पुढे १२ वर्षे त्यांनी तीर्थयात्रेत खर्च केली. या भ्रमंतीत त्यांनी संपूर्ण देश पायी हिंडून पाहिला. तेव्हा त्यांना देशातील लोकस्थितीचे समग्र दर्शन घडले. त्यांनी इ.स. १६४४ पासून समर्थ संप्रदायाची उभारणी केली आणि इ.स. १६८१ मध्ये श्रीमूर्तींच्या सानिध्यात अवलोकन करीत समर्थांनी सज्जनगडावर देह ठेवला.



SANJAY MAR HRM

## समर्थ रामदासांची लेखन प्रेरणा –

इ.स. १६३२ जे १६४४ अशी १२ वर्षे रामदासांनी तीर्थयात्रा केली. मुसलमानी आक्रमणाखाली समाज जे हलाखीचे जीवन जगत होता ते त्यांनी प्रत्यक्ष अनुभवले होते. त्या काळातील राजकीय, धार्मिक, सामाजिक परिस्थिती दु:सह होती. लोकांमध्येही दारिद्रय, अज्ञान होते. असे समाजाचे निरीक्षण करीत रामदासांनी देशाच्या हीन–दीन स्थितीचा प्रत्यक्ष अनुभव घेतला होता. या काळातच रामदासांना स्वत:च्या आध्यात्मिक मुक्तीपेक्षा लोककल्याणाची गरज अधिक वाटू लागली. इ.स. १६४५ मध्ये त्यांनी सातारा सज्जनगडचा परिसर आपल्या कार्यासाठी निवडला आणि तेथे त्यांनी वैदिक वर्णाश्रम धर्माचे 'पुनरूज्जीवन' रामोपासनेच्या बळावर करणारा संप्रदाय स्थापन केला. **त्या संप्रदायाला रामदासी, दास अथवा समर्थ संप्रदाय असे म्हणतात.** त्याचाच भाग म्हणून महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर त्यांनी अनेक मठांची स्थापना केली. उत्तम शिस्तीचे आणि संयमी आचरणाचे शिष्य तयार केले. लोकांतील आळस, शैथिल्य, नाकर्तेपणा झाडून कर्तृत्वाची दिशा दाखविली. श्रीराम व मारूती यांच्या उपासनेला नवा अर्थ दिला. याशिवाय त्यांनी प्रयत्नवादाचा पुरस्कार केला व परमार्थाच्या शिकवणीबरोबरच प्रापंचिक, सामाजिक परिस्थिती लक्षात घेऊन 'प्रपंचविज्ञान' सांगितले. **धर्म, उपासना, ज्ञान, अध्यात्म, राजकारण व रामभक्ती यांचा लोकोद्धारासाठी प्रसार करणे हे समर्थांचे व त्यांच्या संप्रदायाचे प्रमुख उद्दिष्ट होते.**

ते स्वत:ला रामदास म्हणून घेत. त्यांनी **राम आणि मारूती** या दोन समर्थ दैवतांचे माहात्म्ये वाढविले. श्रीरामाची उपासना हा या संप्रदायाचा प्रमुख आधार होता.. समर्थांच्या प्रयत्नवादाला परमेश्वराचे अधिष्ठान होते. **'रामे रामदासी उपदेशिले'** असा प्रत्यक्ष श्रीरामाने आपल्याला उपदेश केल्याचे ते सांगतात. त्याचप्रमाणे शिवाजीमहाराजांच्या राजकीय कार्याला समजावून देणारे वातावरण त्यांनी घडविले. समर्थांची वाङमयीन कामगिरी तर खूपच महत्त्वाची आहे.

## समर्थांचे वाङमयीन कर्तृत्व –

ग्रंथरूप आणि स्फुट काव्यस्वरूप अशी विशिष्ट स्वरूपाची रचना रामदासांनी केली आहे. रामदासांच्या वाङमयीन रचनेवर मुकुंदराज, दासोपंत, एकनाथ व त्र्यंबकराज यांच्या साहित्याचा प्रभाव आहे. **रामदासांनी करूणाष्टके, एकवीस समासी, दोन रामायणे, दासबोध ग्रंथ, मनाचे श्लोक, रामवरदायिनी, आनंदवनभुवन, जुनाट पुरूष, अस्मानी सुलतानी, परचक्रनिरूपण इ. स्फुट प्रकरणे आणि काही श्लोकबद्ध स्फुट कविता व स्फुट ओव्याही लिहिल्या आहेत.**

### १ .करूणाष्टके –

करूणाष्टके या नावाप्रमाणे ही अष्टके कारूण्यांनी ओथंबलेली आहेत. अष्टके असा जरी उल्लेख असला तरी पाच पासून वीस पर्यंत श्लोक असलेली ही रचना आहे. ही रचना म्हणजे रामदासांच्या साधकावस्थेतील ( रचना काळ इ.स. १६२५ ते १६३२) अंतरंगाचे प्रतिबिंबच होय. स्वजन त्याग केला पण 'राम' दर्शन मात्र झाले नाही. **ही रामाची ओढ आणि त्यांच्या विरहाने येणारी मनाची तगमग यांचे दर्शन**



SANJAY MARATHRM

**साधकावस्थेतील रामदासांच्या करूणाष्टकामधून घडते.** प्रपंचातील सुख दु:खांनी शिणलेले त्यांचे मन रामाजवळ विसवण्यासाठी व्याकूळ झालेले या करूणाष्टकातून दिसते. सहज सुंदर अनुप्रासांनी नटलेली मानिनी वृत्तामधील चार ओळींचे एक कडवे अशा गतीने पुढे जाणारी ही श्लोकरचना आहे.

करूणाष्टकामध्ये ओतप्रोत भरलेले कारूण्य, असाहय आर्तता, भावनिकता प्रामुख्याने दिसून येते. रामदास रामासाठी अक्षरश: रडले आहेत. म्हणूनच 'रडवणारी कविता म्हणजे करूणाष्टके' असेही करूणाष्टकाचे वर्णन केले जाते. उदा.

**'अनुदिन अनुतापे तापलो रामराया । परमदिनदयाळा नीरसी मोहमाया ।।**
**अचपळ मन माझे नावरे आवरिता । तुजवीण शिण होतो धाव रे धाव आता ।।'**

असे प्रांजळ निवेदन करून भजनरहित रामा सर्व जन्म वाया गेला असा पश्चाताप ते प्रकट करतात. रघुनायका काय कैसे करावे असे रामालाच ते प्रश्न विचारतात. राम भेटत नाही म्हणून

**'पस्तावलो, कावलो, तप्त झालो । तुझा दास मी व्यर्थ जन्मासी आलो ।'**

असे दु:ख ते व्यक्त करतात. अशा प्रकारे आर्तता आणि कारूण्याचा उत्कर्ष या करूणाष्टकामध्ये पाहावयास मिळतो. भावनेची सूक्ष्मता, व्यापकता, एकात्मकता, उत्कटता ही आत्मनिष्ठ काव्याची सारी वैशिष्टे या करूणाष्टकात आढळतात.

### २.एकवीस समासी –

**करूणाष्टके ही साधकावस्थेतील रचना होती, तर सिद्धी प्राप्त होण्याच्या वाटेवर एकवीस समासीची** रचना झालेली दिसते. या ग्रंथाची ओवीसंख्या **१३४०** असून परमार्थविवेचन हे त्याचे स्वरूप आहे. प्रत्येकाने ईश्वरभक्ती करून आपला उद्धार करून घ्यावा व समोर येणाऱ्या शिष्यांना मार्गदर्शन करावे हा या रचनेमागील हेतू होता. या ग्रंथात सर्वत्र निवृत्तीचे तत्त्वज्ञान भरलेले असून सद्‌गुरू व सत्‌शिष्यांची लक्षणेही सांगितली आहेत. आदर्श भक्त व आदर्श शिष्य यांचे यथार्थ दर्शन या ग्रंथात पाहावयास मिळते.

### ३.रामायणे –

रामदासांच्या नावावर दोन रामायणे आढळतात. एक लहान व दूसरे मोठे. रामदासांपूर्वी संत एकनाथांनी रामचरित्र सांगितले होते. एकनाथांचे 'भावार्थ रामायण' समाजात लोकप्रियही होते. रामदासांनी पुन्हा एकदा रामकथा ओवीबद्ध केली.

रामदासांनी लिहिलेल्या **लघुरामायणाची** श्लोकसंख्या १२५ आहे. त्यात केवळ युद्धकांडच आहे. वाल्मिकीलिखित रामायणाप्रमाणे रामदासांनी या ग्रंथाची रचना केली असून मूळ कथा रामायणातून घेऊन तिचा आपणास हवा तसा आकार त्यांनी दिला आहे. बंदिवासातील देवतांच्या हालापेष्टांचे वर्णन करून रामाने देवतांना कसे सोडविले अशी ही कथा आहे.

दुसरे **रामायण मोठे** असून त्यात १४६२ श्लोक आहेत. हे भुजंगप्रयात वृत्तांत असून त्यात सुंदर ( १०० श्लोक ) व युद्ध ( १३६२श्लोक ) अशी दोन कांडे आहेत. आयुष्याच्या शेवटी रामदासांनी हे

दीर्घरामायण लिहिले. राजनीती, समाजकारण, परमार्थाच्या पायावर उभा प्रयत्नवाद या तीन गोष्टींची शिकवण रामकथेच्या रूपाने समर्थांनी महाराष्ट्राला दिली.

रामायणे लिहिताना रामभक्तीपलिकडे आणखी काहीतरी विशेष हेतू त्यांच्या मनात असावा, असे रामायणांचे अंतरंग पाहताना जाणवते. इ.स. १६३२ ते १६४४ या काळात त्यांनी संपूर्ण देशभर भ्रमंती केली. या भ्रमंतीच्या काळात सभोवतालची स्थिती बदलून टाकण्यासाठी काही नवा संदेश समाजाला दिला पाहिजे असे त्यांना वाटत होते. अन्यायाचा नि:पात करणारा राम जसा पूर्वी उदयाला आला, तसा आता कुणी नवा राम पुढे यावा ही अपेक्षा त्यांनी रामायणातून व्यक्त केली. **'यत्न तो देव जाणावा'** हा आपला आवडता संदेशही या रामायणातून समर्थांनी महाराष्ट्राला करून दिला आहे.

### ४.मनाचे श्लोक –

मराठी माणसांच्या सांस्कृतिक जीवनाचा एक अविभाज्य घटक म्हणजे समर्थ रामदासांचे मनाचे श्लोक. ते 'मनोबोध' या नावानेही ओळखले जातात. स्वत: रामदास या श्लोकांना 'मनाची शतें' म्हणतात. रामदासांनी आपल्या मनाला उद्देशून केलेली ही रचना आहे. भिक्षा मागत असताना रामदासी शिष्याने प्रत्येक घरासमोर उभे राहून एक श्लोक म्हणावा व पुढे जावे म्हणजे प्रत्येक घरात एकेक विचार दिल्याचे कार्य होईल या हेतूने मनाच्या श्लोकांचे लेखन झाले. हे श्लोक भुजंगप्रयात वृत्तांत असून त्यांची संख्या २०५ इतकी आहे. त्यांचे रचनास्थळ व काळ निश्चितपणे सांगता येत नाही. सूत्ररूपाने जीवनासंबंधीचे मौलिक विचार या श्लोकामध्ये गुंफले आहेत. संत तुकारामांच्या वचनांसारखे या मनाच्या श्लोकालाही सुभाषितांची योग्यता लाभली आहे.

उदा. १. मना सज्जना भक्तिपंथेचि जावे.

२. मना श्रेष्ठ धारिष्ट जीवी धरावे.

३. मना चंदनाचे परि त्वा झिजावे.

४. मरावे परि कीर्ति रूपी उरावे.

५. जगी सर्व सुखी असा कोण आहे । विचारी मना तुचि शोधुनि पाहे ।।

६. क्रियेविना वाचाळता व्यर्थ आहे.

७. मरे एक त्याचा दुजा शोक वाहे । अकस्मात तो ही पुढे जात आहे ।।

या सारख्या श्लोकांतून भक्तीमार्गाचा उपदेश, समाजमनास बोध, लोकसेवेची शिकवण, आदर्श जीवनाची कल्पना आणि कर्तव्याची आठवण समर्थांनी करून दिली आहे. सर्वांना सहज समजेल, रूचेल, पचेल असा उपदेश अत्यंत सोप्या शब्दात मनाच्या श्लोकातून रामदासांनी केला आहे.

### ५. दासबोध –

रामदासांचे चिंतन, विचारधन, अभ्यास आणि त्यांचा अनुभव या मधून निर्माण झालेली स्वतंत्र ग्रंथनिर्मिती म्हणजे दासबोध होय. या ग्रंथाची रचना इ.स. १६३२ ते १६८१ पर्यंत चालू होती. **दासबोधाचे पूर्वार्ध ( ३८६६ श्लोकसंख्या ) व उत्तरार्ध ( ३८८५ श्लोकसंख्या ) असे दोन भाग असून एकूण श्लोकसंख्या**



SANJAY MARHIRM

७७५१ एवढी आहे. दासबोध ही एकवीस समासीची सुधारित आवृत्ती आहे. याचे स्वरूप गुरू – शिष्य संवादरूपाचे आहे.

**'ग्रंथनाम दासबोध । गुरूशिष्यांचा संवाद । येथ बोलिला विशद । भक्तिमार्ग ।।'**

दासबोधामध्ये अध्यात्माचेच निरूपण आहे. पण हे निरूपण केवळ पारमार्थिक अशा लोकांसाठी नाही तर ते समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्न करणा—या कार्यकर्त्यांसाठी आहे.

**'पहिले ते हरिकथा निरूपण । दुसरे ते राजकारण । तिसरे ते सावधपण । सर्व विषयी ।।'**

या ओवीतून दासबोधातील आशयाचे स्वरूप स्पष्ट होते. आध्यात्मातील कृतार्थपणा आणि ऐहिक जीवनाची समृद्धी या दोनही गोष्टींना उपयोगी होईल असा उपदेश रामदासांनी दासबोधातून केला आहे. म्हणून दासबोधातील विषय व्यापक आहे. भक्ती, सृष्टीचा जन्म आणि विकास, गुरू शिष्यांची लक्षणे, मूर्खांची लक्षणे, उत्तम पुरूषांची लक्षणे, चातुर्यांची लक्षणे, प्रपंचाचे मोठेपण, राजकारणाची मूलतत्त्वे, लेखन क्रिया असे असंख्य विषय दासबोधात आहेत. उदा.

१. जितके काही आपणास ठावे । तितुके इतरांना शिकवावे ।
   शहाणे करून सोडावे । सकळजण ।।
२. सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे ।
   फक्त अधिष्ठान पाहिजे । भगवंताचे ।।
३. आधी प्रपंच करावा नेटका । मग घ्यावे परमार्थ विवेका ।
   प्रपंच सोडून परमार्ग कराल । तेणे तुम्ही कष्टी रहाल ।
   प्रपंच परमार्गी चालवाल । तर तुम्ही विवेकी ।।
४. उत्कट भव्य ते घ्यावे । मिळमिळीत ते टाकावे ।।
५. तो दुस—यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ।।

दासबोधातील विषय भावनेपेक्षा विचाराला आवाहन करणारे आहेत. समर्थांनी ते रोखठोकपणे सांगितले आहेत. सुस्पष्ट विचार, परखडपणा हे समर्थांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष आहेत. दासबोधातून रामदासांनी प्रवृत्तीवाद व प्रपंच विज्ञान यांचा पुरस्कार केला. रामदासांच्या दासबोधातील शिकवण ही लौकिक जीवनाशी निगडीत आहे. म्हणून ते प्रवृत्तीवादी संत ठरतात.

### ६.स्फुट प्रकरणे –

रामदासांच्या मनाला समाजहिताची तळमळ लागली होती. त्या तळमळीतून त्यांनी काही स्फुट स्वरूपात रचना केली आहे. शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांना त्यांनी लिहिलेली ओवीबद्ध पत्रे यात आहेत. काही स्तोत्रे आहेत आणि **'आनंदवनभूवन'** हे ५९ ओव्यांचे अतिशय सुंदर काव्य ही आहे. त्यांनी तीर्थयात्रे प्रसंगी समर्थांना दिसलेल्या उद्विग्न समाजाचे चित्र **'अस्मानी सुलतानी'** प्रकरणात, परकीय आक्रमनाने निर्माण झालेल्या सामाजिक स्थितीचे चित्रण **'परचक्र निरूपण'** या प्रकरणात मांडले आहे. तर **'रामवरदायिनी'** हे

SANJAYKUMAR HRM

प्रतापगडाच्या भवानीमातेला अनुलक्षून म्हटलेले स्तोत्र आहे. याशिवाय क्षात्रधर्म, सेवकधर्म, राजधर्म, जुनाट पुरूष अशी काही स्फुट प्रकरणे रामदासांनी लिहिली आहेत.

राजा किंवा लोकनेता कसा असावा याचे फार अप्रतिम विवेचन करताना रामदासांनी शिवाजी महाराजांना पाठविलेल्या पत्रात त्यांचे मार्मीक गुणवर्णन केले आहे.

**'निश्चयाचा महामेरू । बहुत जनांसी आधारू । अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंतयोगी ।।**
**यशवंत कीर्तीवंत । सामर्थ्यवंत वरदवंत । पुण्यवंत नीतीवंत । जानता राजा ।।**

शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजी महाराजांना लिहिलेल्या पत्रात

**'आहे तितुके जतन करावे । पुढे आणिक मिळवावे ।**
**महाराष्ट्र राज्य करावे । तिकडेतिकडे ।।'**

असा उपदेश करून

**'शिवाजीराजास आठवावे । जीवित्व तृणवत मानावे ।**

अशी सूचनाही केली आहे. आदर्श राजा आणि राज्य यांचे सुंदर आणि उत्साहजनक चित्रही त्यांनी रेखाटले आहे आणि

**'मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा ।'**

अशी संभाजी महाराजांकडून अपेक्षाही व्यक्त केली आहे. समर्थांच्या सांगण्याप्रमाणे शिवरायाचे रूप, त्याचा प्रताप, त्याचा साक्षेप, त्याचे बोलणे, चालणे हे सर्व आठवून संभाजी महाराजांनी राज्यसाधना करण्याची लगबग केली पण दुर्दैवाने त्यांच्या अकाली मृत्यूने महाराष्ट्राचा इतिहास रामदासांच्या बोलण्याप्रमाणे झाला नाही.

### संत रामदासांच्या काव्याचे ठळक वैशिष्टे –

रामदासांच्या कवितेत त्यांचे संत, महंत, कवी व काव्यशास्त्रज्ञ असे चतुर्विध व्यक्तिमत्त्व प्रतिबिंबित होते. वीरता आणि वैराग्य या दोन्हींची त्यांना सारखीच ओढ होती. त्यांनी विविध छंदात व वृत्तात कविता लिहिली. रामदास काव्याचे जाणकार होते. दासबोधात त्यांनी कवीच्या प्रतिभागुणांचा गौरव केला आहे. तसेच इतरत्रही काव्यनिर्मिती, काव्यप्रयोजनासंबंधी लिहिले आहे. त्यानी लिलिलेल्या आरत्या, भूपाळयात त्यांच्या लयबद्ध रचना चातुर्याची कल्पना येते. **उदा. 'सुखकर्ता दु:खहर्ता वार्ता विघ्नाची', 'लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा' या सारख्या आरत्यातून त्यांच्या शब्दप्रभुत्वाची साक्ष पटते.** विरक्त असुनही त्यांच्यामध्ये समग्र जीवन व्यापून टाकणारी सौंदर्यदृष्टी होती. त्यामुळे त्यांची भाषा ओघवती आणि गोड आहे.

रामदासांच्या काव्याचे सर्वात **ठळक वैशिष्टे म्हणजे त्यातील सामाजिक जाणीव**. त्यांचासारखा डोळस व सर्वांगीण सामाजिक जाणीव असणारा दुसरा संतकवी मराठीत नाही. दासबोधासारखा त्यांचा ग्रंथ त्यांच्या तेजस्वी विचारधारेमुळे अत्यंत परिणामकारक झाला आहे. रामदासांनी आपल्या कवितेतून लोकशिक्षण केले. त्यांच्या कवितेतील असंख्य वचने सुभाक्षिते होऊन मराठी भाषेत व जनमानसात रूजून बसली आहेत. समाजाच्या नैतिक आणि आध्यात्मिक उन्नतीविषयी अखंड जागरूकता आणि अतीव तळमळ रामदासांच्या काव्यात आढळते. त्यामुळेच **'राष्ट्रोद्धारक संतकवी'** म्हणून संतमालेत त्यांचे स्थान वेगळे ठरते.



SANJAY MAR HRM

समारोप –

'समर्थ' सा लोकप्रिय पदवीने ओळखले जाणारे रामदासस्वामी हे संत परंपेतील अखेरचे मोठे संत होत. त्यांनी समर्थ संप्रदायाची स्थापना करून विपूल स्वरूपात ग्रंथरचना केली. या ग्रंथ रचनेतून परमार्थाबरोबर प्रपंचाचेही महत्त्व सांगितले आणि हनुमानाच्या माध्यमातून बलाची उपासना करून प्रयत्नवाद, क्रियाशिलतेला महत्त्व दिले. म्हणून रामदासस्वामींचे स्थान मराठी संतपरंपरेत महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या ग्रंथरचनेनीही महाराष्ट्राला दिशा देण्याचे बहुमोल कर्तव्ये बजावले आहे.

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**अध्यापन साहित्य निर्मिती :**
**डॉ. संजय शिंदे**
**हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर**

**संदर्भ ग्रंथ :**

१) **मध्ययुगीन मराठी वाङ्मययाचा इतिहास नसिराबादकर.रा.ल :**

२) **प्राचीन मराठी वाङ्मययाचा इतिहास : अ.ना.देशपांडे**

SANJAY MAR HRM